लोकजागृती शिक्षण संस्था, गोसे (बु.) ता.पवनी जि. भंडारा संचलित बाबा खंताळू प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही आश्रमशाळांची मान्यता दि. १ नोव्हेंबर ,२०१६ पासून रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांकः याचिका-२०१७/प्र.क्र.८८/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
तारीख: ०३ नोव्हेंबर, २०१७

वाचा

१. समाज कल्याण,सांस्कृतीक कार्य व क्रिडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांकः क्र. व्हीऐऐएस-१०९० /३७६६१/प्रक्र.१४/मावक-६ , दि. १३ ऑगस्ट, १९९०
२. संचालक विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश क्र.विजाभजसं/प्राआशा/लोशिसं/गोसे/भंडारा/मान्यता रद्द/४२६ / दि.३० मे २०१३
३. शासन आदेश क्र. अपिल २०१३/६७५/प्र.क्र.२१८/विजाभज-२ दि. २० सप्टेंबर २०१३
४. शासन आदेश क्र.अपिल २०१३/६७६/प्रक्र.२१९/विजाभज-२ दि. २० सप्टेंबर २०१३
५. शासन आदेश क्र.अपिल २०१३/६७६/प्रक्र.२१९/विजाभज-२ दि. ०८ मे २०१५
६. शासन आदेश क्र.अपिल २०१३/६७६/प्रक्र.२१९/विजाभज-२ दि. १ जुलै २०१६
७. शासन शुद्धीपत्रक क्र. अपिल२०१३/प्रक्र.२१९/विजाभज-२/दि. २२ मार्च २०१७
८. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये दाखल याचिका क्र. ६०५०/२०१६ व ६०५१/२०१६ मध्ये मा.न्यायालयाचे दि. २८ ऑगस्ट २०१७ रोजीचे निर्देश

प्रस्तावना

महाराष्ट्र शासन समाज कल्याण सांस्कृतिक कार्य,क्रिडा व पर्यटन विभाग,मंत्रालय मुंबई यांचे कडील शासन निर्णय क्र.व्हीऐऐएस-१०९० /३७६६१/प्रक्र.१४/मावक-६ , दि. १३ ऑगस्ट, १९९० अन्वये लोकजागृती शिक्षण संस्था भंडारा या संस्थेस प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा चालविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदरहू संस्थे कडून बाबा खंताळू विजाभज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जि. भंडारा अशा दोन आश्रमशाळा येथे सन १९९०-९१ पासून चालविल्या जात आहेत.सदरहू दोन्ही आश्रमशाळांची वारंवार केलेल्या तपासणीत आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संचालक, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. ३०/०५/२०१३ च्या आदेशान्वये (संदर्भ क्र. २) उपरोक्त दोन्ही आश्रमशाळांची मान्यता रद्द केली होती. संचालकांच्या दि. ३०/०५/२०१३ च्या आदेशा विरुध्द संस्थेने तत्कालीन मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग) यांच्याकडे अपिल दाखल केले होते. या अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग) यांचेकडे दोन्ही अपीलांवर दि.०७.०८.२०१३ रोजी सुनावणी घेण्यात आली. तत्कालीन मा. मंत्री महोदयांनी घेतलेल्या सुनावणीत संचालकांचे दि.३०.०५.२०१३ चे आदेश रद्द करुन सदरहु संस्थेच्या प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांना त्रुटींची/उणीवांची पूर्तता करण्यासाठी दि.२०.११.२०१३ च्या आदेशान्वये प्रथमत: ६

महिन्यांची, त्यानंतर दि. ०८/०५/२०१५ व दि. ०१/०७/२०१६ च्या पत्रान्वये तीन तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती आणि शैक्षणिक सत्र सन २०१६-१७ सुरु झाल्यानंतर प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण, नागपूर व सहायक आयुक्त समाज कल्याण, भंडारा यांनी आश्रमशाळांची तपासणी करुन अहवाल शासनास सादर करावा व या तपासणी अहवालानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल असे स्पष्ट केले होते. त्यानुसार त्यांनी सदरहू संस्थेच्या दोन्ही आश्रमशाळांची वेळोवेळी तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर केला. मात्र दोन्ही आश्रमशाळांची वेळोवेळी केलेल्या तपासणीत अनेक त्रुटी / उणिवा आढळून आल्या. यानंतर सहायक आयुक्त समाज कल्याण, भंडारा यांनी दि. ०४/०७/२०१७ रोजी या दोन्ही आश्रमशाळांची तपासणी करुन अहवाल सादर केला, त्यानुसार तपासणीच्या वेळेस या आश्रमशाळांच्या पटावर एकूण ५४ विदयार्थी असल्याचे दर्शविण्यात आले होते. परंतु, सदरहू दोन्ही आश्रमशाळांमध्ये एकही विदयार्थी तपासणीच्या वेळेस हजर नसल्याचे आढळून आले आहे. याशिवाय सदरहू आश्रमशाळांमध्ये असलेल्या त्रुटी / उणिवांची कोणतीही पुर्तता झाली नसल्याचे आढळून आले .

या आश्रमशाळांच्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे रोखण्यात आलेले वेतन व इतर भत्ते मिळण्यासाठी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ६०५०/२०१६ व ६०५१/२०१६ दाखल केल्या होत्या. या रिट याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि. २८/०८/२०१७ रोजी आदेश पारित केले असून त्यानुसार या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते अदा करण्यात यावेत तसेच या आश्रमशाळांना मान्यता देणे किंवा मान्यता रद्द करणे याबाबतचा निर्णय चार महिन्याच्या आत घेण्यात यावा असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे सदरहू आश्रमशाळांसंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे आदेश आणि वेळोवेळी केलेल्या तपासणीचा अहवाल लक्षात घेता, सदर आश्रमशाळेबाबत योग्य तो निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

लोकजागृती शिक्षण संस्था भंडारा या संस्था संचालित बाबा खंताळू विजाभज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जि भंडारा या दोन्ही आश्रमशाळांना सुधारणा करण्याची वारंवार संधी देउन मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, सदरहू संस्थेच्या आश्रमशाळांमध्ये विदयार्थ्यांच्या संख्येत कोणतीही वाढ झाली नाही. तसेच आश्रमशाळांमधील त्रुटी / उणिवांची पूर्तता झाली नाही. या सर्व बाबीस संबंधित संस्थेचे संचालक तसेच आश्रमशाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जबाबदार आहेत. शासनाने वेळोवेळी मुदतवाढ देऊनही संस्थेने दोन्ही आश्रमशाळांमधील त्रुटी व उणिवांची पुर्तता केली नाही. सदरहू आश्रमशाळांना दिलेली मुदतवाढ दि. ३१/१०/२०१६ रोजी संपुष्टात आली आहे. तसेच सद्य:स्थितीत सदरहू आश्रमशाळेत एकही विद्यार्थी नाही. त्यामुळे सदरहू दोन्ही आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना विनाकाम वेतन देणे शासनास परवडणारे नाही. त्यामुळे सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश आणि क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी तपासणी करुन सादर केलेला अहवाल विचारात घेऊन या दोन्ही आश्रमशाळांची मान्यता दि. ०१/११/२०१६पासून रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

यास्तव, शासनाचा सदरील निर्णय संबंधित संस्थेस तात्काळ कळवून सदर बाब मा.उच्च न्यायालयाच्या शपथपत्राव्दारे निदर्शनास आणूण द्यावी. तसेच सदरहू आश्रमशाळेबाबत विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांकडे हस्तांतर / स्थलांतराबाबत शासन निर्णय दि. १९/१२/२०१६ अन्वये संचालक, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पुढील कार्यवाही तातडीने करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०८१६४९४०११२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2017.11.08 16:37:51 +05'30'

(भा. र. गावित)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई यांचे यांचे खाजगी सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव यांचे खाजगी सचिव.
३. मा. मंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५. सचिव, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक.
६. संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. धर्मदाय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा
९. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग , नागपूर.
१०. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, भंडारा
११. अध्यक्ष / सचिव, लोकजागृती शिक्षण संस्था, गोसे (बु.) ता.पवनी,जि. भंडारा
१२. निवड नस्ती (विजाभज-२)